

माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते रितु छाब्रिया यांच्या वतीने मुक्ताई पुरस्कार स्वीकारताना मीना डिसा.

# रितू छाब्रिया यांना मुक्ताई पुरस्कार

पुणे : शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रात मुकुल माधव फाउंडेशनने केलेल्या कार्याची दखल घेऊन आत्मोन्नती व विश्वशांती साधक संस्था मुंबई व श्री संत आदिशक्ती मुक्ताई विश्वकल्याण फाउंडेशनच्या वतीने मुकुल माधव फाउंडेशनच्या अध्यक्षा रितू छाब्रिया यांना मुक्ताई पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शनिवारवाडा येथे आयोजित केलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते रितु छाब्रिया यांच्या वतीने संस्थेच्या सदस्य मीना डिसा यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील, सोपानकाका वाल्हेकर महाराज, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ देवीसिंह शेखावत, जळगाव येथील मुक्ताई संस्थानचे ॲड. रवींद्र पाटील आदी उपस्थित होते. यावेळी आमदार शोभा फडणवीस, अशोक गोडसे, प्रकाश देवळे, धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने गौरविण्यात आले.